
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा. वा.
दा. क्र. ११५८



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ११५९ दिनांक ......
विषय बा. वा. क्र. ५१२५.


BVBK-0401159






# अगडं बगडं

अगडं बगडं डं चिकी डंग
गोल गोल फुग्याचा लाल लाल रंग
तिरकिट् तिरकिट् तडम् तडम्
फू फू फुगा फुगला टम्
कडकट् कडकट् कडाड् कट्
फू फू फुगा फुटला फट्



BVBK-0401159



# इवलिशी चिमणी


इवलिशी चिमणी
चिवचिवते
झाडाच्या पानांना
डोलवते...
इवलिशी चिमणी
भुरभुरते
आभाळाला लपाछपी
शिकवते...

इवलिशी चिमणी
टुणटुणते
घरापुढच्या अंगणाला
खेळवते...
इवलिशी चिमणी
किलबिलते
चिडीचिप बाळाला
झोपवते...



# टप टप पाऊस

टप टप पाऊस पडला
राघू झाडात दडला
सर सर सरी आल्या
गाई घरी गेल्या
झुळ झुळ वाहिलं पाणी
नदी गाते गाणी
नदीला आला पूर
मामाचा वाडा दूर
मामा मोठा मायाळू
एकेक देतो जरदाळू !




# खुदु खुदु हसू

खुदु खुदु हसू बाई खुदु खुदु हसू
नाकोबाच्या शेंड्यावरल्या रागोबावर रूसू
नाकोबाचा शेंडा वीतभर सडक
रागोबाचा गोंडा लाल लाल भडक
ठस ठस सूं बाई ठस ठस सूं ऽऽ
हसू बाई हसू ऽऽ हसू बाई हसू ऽऽ
खुदु खुदु हसू ऽऽ खुदु खुदु हसू ऽऽ

# गणिताचा मंत्र

आव जाव खाजा खाव
खाव तर खाव सगळा खाव
मनीच्या मिशांचा सस्ता भाव
म्याव म्याव म्याव मने मने म्याव
सग्गळी गणितं सोडवून जाव !!



# अक्कणमाती

अक्कणमाती
चिक्कणमाती
चिरवलात फसले
दोन हत्ती
हत्ती केवढे जाडजूड?
डोंगराएवढे मोठ्ठे धूड!!



# विदूषक



विदुषकाचे डोळे म्हणजे
गाडीचे चाक
लंबाडे लंबाडे
केवढे लांब नाक !
नाकाच्या शेंड्यावर
माशीताई बसली
मनातल्या मनात
खुदकन हसली !



# मोर

पाऊस आला धो धो
तेव्हा होतास कुठे मोरा?
हिरव्या हिरव्या बागेमध्ये
नाचत होतो जरा!
मोरा मोरा कुठला तू?
छान किती वेष!
आंबे, काजू, फणसवाला
कोकण माझा देश!

# पिशवी

स्वप्नात येते
एक पिशवी
तिच्यात असतात
केळी, पेरू . . .
उजाडताच
गळ्यात पडते
पिशवीत असतात
गणित, बोरू . . . !





# अपलम चपलम

अपलम चपलम चम चम चम
गुलाबाचे अत्तर घम घम घम

इवलेसे फूल डुलु डुलु डुलु
इवलासा थेंब टुळु टुळु टुळु

इवलिशी कुपी छान छान किती
बाळ गेला झोपी बोलू नका अती !





# भेंडी

हिरव्यागार भेंडीला
हिरवी हिरवी शेंडी
हिरवीगार भेंडी
नि सगळ्यांशी भांडी
एकदा भांडण ऐकून
आजी आली धावून
पुढे झाली आजी
नि भेंडीची केली भाजी!

# खाऊसाठी युक्ति



अर्ध्या रात्री
हळूच ऊठ
नदीच्या दिशेने
पळत सूट
पळताना लागेल
डोंगर बारका
तोच देईल
पंचवीस खारका
पंचवीस खारका
झाल्या मोप
अर्ध्या रात्रीच
येऊन झोप !



# ठकी

अंगठ्याएवढी ठकी
आपलाच अंगठा चोरवी
अंगठ्यात सात सागर
अंगठ्यात दुधाची घागर
अंगठ्यात दह्याचा माठ
ताकाची लोटकी आठ
अंगठ्यात लोण्याचा गोळा
तुपाच्या वाट्या सोळा
अंगठ्याएवढी ठकी
पण सगळं पिऊन टाकी

# भाजी घ्या भाजी

भाजी घ्या भाजी
घेता का आजी ?
आहे का रे पण
तुझी भाजी ताजी ?
हिरवी गार कवळी
कच्ची खाल आजी !



BVBK-0401159